जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९०        दिनांक - १९/११/२०२४**

फरासखाना पोलीस स्टेशन पुणे शहर

## घरफोडी चोरी करणा-या एका इसमास शिताफिने अटक करुन,तपासा दरम्यान ४,५७,२००/- रु किमंतीचा मुद्देमाल केला हस्तगत

फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक ०३/११/२०२४ रोजी दिवसा घरफोडी चोरी झाल्यानंतर,फरासखाना पोलीस स्टेशन येथील प्रभारी श्री.प्रशांत भस्मे यांनी तपास पथकातील अधिकारी वैभव गायकवाड व अरविंद शिंदे तसेच तपास पथकातील पोलीस अमंलदार यांना मार्गदर्शन व महत्वाच्या सुचना दिल्यानंतर व तपास पथकातील अधिकारी वैभव गायकवाड व अरविंद शिंदे,तसेच स्टाफ यांनी घटनास्थळाचे तसेच आरोपीने वापरलेल्या गाडीचा माग काढुन, सी.सी.टी.व्ही फुटेज तसेच तांत्रिक विश्लेषन द्वारे सदरचा गुन्हा रेकॉर्ड वरील आरोपी नामे रय्यान ऊर्फ फइम शेख व त्याचे वडील असे दोघांनी लाल रंगाची बर्गमॅन गाडीवर येवुन केल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले.

तपास पथकातील पोलीस अमंलदार प्रविण पासलकर,गजानन सोनुने व महेश राठोड यांचे गोपनीय बातमी वरुन,दिनांक १५/११/२०२४ रोजी ढमढेरे गल्ली,बुधवार पेठ पुणे येथुन तपास पथकातील पोलीस स्टाफचे मदतीने आरोपी इसम **फैय्याज राज मोहम्मद शेख रा.सत्यानंद नगर, मिठा नगर,कोंढवा खुर्द पुणे** यास अटक करुन,पोलीस कस्टडी दरम्यान फरासखाना पोलीस स्टेशन कडील एक गुन्हा उघडकीस आणुन ३६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ५०० ग्रॅम वजनाची चांदीची विट,१०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, ५५,०००/- रु.रोख रक्कम,गुन्हयात वापरलेली सुझुकी (बर्गमॅन) कंपनीची गाडी,लोखंडी कटावणी असा सर्व मिळुन ४,५७,२००/-रु.किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात तपास पथकाला यश आले आहे. दाखल गुन्हयाचा तपास अरविंद शिंदे, पोलीस उप-निरीक्षक हे करीत आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परि १ श्री.संदिपसिंह गिल, मा.सहा.पो.आयुक्त फरासखाना विभाग श्रीमती नुतन पवार, यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.प्रशांत भस्मे, पो.नि.(गुन्हे) श्री. अजित जाधव,स.पो.नि.वैभव गायकवाड, पो.उप-नि.अरविंद शिंदे, सपोफौज मेहबुब मोकाशी, पोलीस अमंलदार,प्रविण पासलकर,गजानन सोनुने,महेश राठोड,वैभव स्वामी,तानाजी नागंरे,नितीन तेलंगे, संदिप कांबळे,विशाल शिंदे,किशोर शिंदे,नितीन जाधव,अर्जुन कुडाळकर,समिर माळवदकर,सुमित खुट्टे,महेश पवार,शशिकांत ननावरे,चेतन होळकर,यांनी केलेली आहे.